ISSN : 2348-7143 (Online)
April-June-2014

# लघु शोध निबंध : भुसावळ बॉम्ब खटला

**डॉ. सुलोचना अ. पाटील**
इतिहास विभाग, सामजिक शास्त्रे प्रशाळा.
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव,
[महाराष्ट्र] भारत.

**भुसावळ बॉम्ब खटल्याची पार्श्वभूमी :-**

भारतीय स्वातंत्र्य आंदोलन हे अनेक रोमांचकारी घटनांची साक्ष देणारे आंदोलन आहे. संपूर्ण भारतात स्वातत्र्यं प्राप्तीसाठी विविध घटना घडत होत्या. त्यात जळगांव जिल्हा देखील मागे नव्हता. जळगांव जिल्हयात भुसावळ बॉम्ब खटला ही अशीच एक अभुतपूर्व घटना घडली.

"पारतंत्र्यात खितपत पडलेल्या भारतीयांच्या भावना लक्षात घेऊन ब्रिटीश सरकारने १९१९ च्या राज्य घटनेच्या कायद्यात काही सुधारणा केल्या. हया कायद्याच्या परिणामांचा आढावा घेण्यासाठी सर जॉन सायमन यांचे नेतृत्वाखाली नेमलेली कमेटी भारतात आली. या सायमन कमीशनचा निषेध मोर्चे, काळीनिशाने व बहिष्कार टाकुन करण्यात आला. लाहोर शहरात ३० ऑक्टोबर १९२८ साली लाला लजपतरायजींच्या नेतृत्वाखाली एक लाख लोकांच्या निषेध मोर्च्यावर पोलीस सुपरिटेंडेट मि. स्कॉट व डेप्युटी. सुपरिडेंट ऑफ पोलीस मि. सँडर्स यांनी केलेल्या लाठीमारात लालाजी जखमी होऊन १७ नोव्हे. १९२८ रोजी दगावले. तरुण पिढी खवळली सँडर्सचा खुन झाला. चौकाचौकात पत्रके झळकली सँडर्स इज डेड, लालाजी इज ॲव्हेंज्ड... १९२८ साली असेंब्लीत जाचक पब्लीक सेफ्टी बील व ट्रेड डिस्प्युट बील मांडले. ह्या जनविरोधी बीलांच्या निषधार्य ८ एप्रिल १९२९ रोजी भगतसिंह व बटुकेश्वर दत्त त्यांनी असेंब्लीत बॉंब फेकले. भगतसिंह लाहोरचे म्हणुन सँडर्स वधाशी त्यांचा संबंध असेल काय याचा शोध घेण्यात येत होता. या दरम्यान लाहोरच्या काश्मिर बिंल्डींग मधील बॉम्ब कारखाना पोलीसांनी हेरला व सुखदेव, किशोरीलाल व जयगोपाळ पकडले गेले. मात्र क्रांतीकारी हिंदुस्थान व समाजवादी प्रजातंत्र सेनेचे प्रमुख चंद्रशेखर आझाद, भगवतीचरण, दुर्गाभाभी, सुशिलादीदी, यशपाल, भगवानदास माहौर, सुखदेवराज, सदाशिवराव मलकापुरकर, फणीद्र घोष आदी क्रांतीकारी फरारी झाले. उत्तर भारतात पोलीसांनी मजबुत जाळे पसरविले होते. म्हणुन बॉम्ब कारखाने आणि संघटना दक्षिण भारतात विशेषत: वऱ्हाडात हलविण्याचा आझादांनी विचार केला. विश्वनाथ वैंशपायन यांना अकोला येथे श्री. सहस्त्रबुध्देकडे विचार विनीमयासाठी पाठविले. प्रथम भगवानदास माहौर व सदाशिवराव मलकापूरकर यांनी अकोल्याला यावे नंतर आझाद व वैंशपायन येतील असे ठरले. माहौर व मलकापूरकर झाशीहुन निघाले." ।। १ ।। भगवानदास माहौर व सदाशिव मलकापूरकर हे जरी झाशीला शिकायला होते तरी ते मुळ महाराष्ट्रीयन होते. ११ सप्टें. १९२९ या दिवशी तुरंगात जतिंद्रनाथ शेवटचा श्वास घेत होते. राजगुरु अकोल्यात असतील या कल्पनेने चंद्रशेखर आझादांनी ग्वाल्हेरच्या बॉम्ब तयार करण्याच्या

केंद्रातील बरेचसे साहीत्य दोन जिवंत बॉम्ब, दोन पिस्तुले, काडतुसे, बॉम्ब बनविण्यासाठी लागणारी रसायने इत्यादी ऐवज घेऊन भगवानदास माहौर व सदाशिवराव मलकापूरकर या दोघांना चंद्रशेखर आझादांनी अकोल्यास जाण्यास सांगितले. " हे दोघे कोठे जाणार आहेत हे त्यांना स्टेशनवर पोहचावयास आलेल्या गजानन पोतदारांना माहीत नव्हते." ।। २।। भगतसिंग, राजगुरु यांना बॉम्ब तयार करण्याचे प्रशिक्षण जतिंद्रनाथ यांनी दीले होते. भगतसिंग आणि राजगुरु यांनी आग्रा व ग्वाल्हेर येथे बॉम्ब तयार करण्याची केंद्र सुरु केली होती. " बॉम्ब बनविण्याच्या आणि त्याच्या चाचण्या घेण्याच्या उलाढालीत गजानन सदाशिव पोतदार, सदाशिवराव मलकापूरकर, आणि विश्वनाथ वैशंपायन हे चंद्रशेखर आझादांना मदत करीत होते." ।। ३ ।। " क्रांतीकारकांच्या गुप्त संघटनेत सर्व योजना सर्वांना विश्वासात घेऊन सांगितल्या जात नसत. आपल्यावर सोपविलेल्या कामगीरीबद्दल कोणाशी बोलायचे नाही आणि त्याबद्दल कोणी त्याबद्दल विचारायचे नाही असा संकेत पाळला जात असे.

**भुसावळ रेल्वे स्टेशनवर क्रांतिकारकांना अटक :-**

भगवानदास माहौर आणि सदाशिव मलाकापूरकर पेशावर एक्सप्रेसने प्रथम झाशीला गेले आणि तेथे वैशंपायन यांनी दिलेले सामन घेऊन ११ सप्टे. रोजी संध्याकाळी अकोल्यास जाण्यासाठी म्हणुन भुसावळ रेल्वे स्टेशनवर उतरले." ।। ४ ।। रेल्वे स्टेशनवर उतरल्या नंतर सिमा शुल्कच्या अधिकाऱ्याला त्यांच्या जवळील मोठया व जड पेटया पाहुन शंका आली. म्हणुन त्यांनी त्या जड पेटया तपासण्याचा आग्रह धरला. आणि तो लोखंडी पेटीतील साहीत्य तपासु लागला, " तितक्यात मोठया कुशलतेने भगवानदास माहोर यांनी भरलेले पिस्तुल उचलून खिशात घातले. मात्र ट्रंकेतील काडतुसांचे एक पुडके खाली पडल्याने तपासणीसाचा संशय बळावून त्याने शिटया फुंकून पोलीसांना बोलाविले तितक्यात खिशातील स्वयंचलित पिस्तुलाने गोळया झाडीत निसटण्याचा माहोरांनी केलेला प्रयत्न अपयशी ठरला तेव्हाच साधन सामुग्रीची मणभर वजनाची ट्रंक उचलुन रेल्वे लाईन मधून पलायन करतांना सदाशिवराव मलकापूरकरांचा पाय सिग्नलच्या तारेमध्ये अडकल्याने ते खाली पडले अशा रितीने ११ सप्टे. १९२९ रोजी भगवानदास माहोर व सदाशिवराव मलकापूरकर हे चंद्रशेखर आझादांचे सहकारी भुसावळ येथे पकडले गेले. " ।। ५ ।। या संदर्भात ऐ.एस. हॉलंड इन्सपेक्टर जनरल ऑफ पोलीस क्रीमीनल इनव्हिस्टीगेशन डीपार्टमेंट पुणे यांनी सेक्रेटरी ऑफ गव्हरमेंट बॉम्बे होम डीपार्टमेंट स्पेशल यांना पत्र क्र. ९/१०३ ऑफ १९२९ दिनांक २१ सप्टे. १९२९ ला या घटनेचे सविस्तर ९ पानाचे पत्र पाठविले आहे. त्यात तो म्हणतो. " ११ सप्टें. १९२९ च्या सायंकळी ६ वाजता सदाशिव रघुनाथ मलकापूरकर आणि भगवान तुलसीदास माहोर दोन्ही झाशीचे रहीवाशी हे दोन प्रवासी बॉम्बे एक्सप्रेसने १९८ अप ने भुसावळला उतरले त्यांना एक्साईस पोलीसांनी हटकले बऱ्याच वादानंतर सदाशिवने आपली पेटी उघडली त्यात काही काडतुसे आणि एक पिस्तुल आढळुन आले... पोलीसांनी पंचनामा करण्यास सुरुवात केली तेवढयात भगवानदासाने पिस्तुल काढले व

गोळया झाडण्यास सुरुवात केली... व तो पळाला सदाशिवसुध्दा आपली पेटी उचलुन पळू लागला पोलीसांनी त्याचा पाठलाग केला आणि जेव्हा पोलीस हेड कॉन्सटेबल बंदगीरी सदाशिवरावाला पकडणार तेवढयात भगवानदासाने त्याच्यावर गोळया झाडल्या तो कुंपणावर चढण्याच्या प्रयत्नात असतांना बंदगीरीने त्यांना पकडले व सदाशिवरावाला शेख सरदार करीम याने पकडले... भगवानदासकडचे पिस्तुल जप्त केले. सदाशिवरावाच्या पेटीत खालील वस्तु आढळून आल्या एक मॉसर ऑटोमॅटीक पिस्तुल त्यात ९ गोळया भरलेल्या होत्या, ६२ काडतुसे, विक्रीक ॲसीड सॉल्फेर सल्फर, दारुने भरलेल्या डब्या, गन कटर, दोन गावठी आग्राटाईपच्या सिगारेट केस, ४ दारुगोळा भरलेल्या डब्या आढळून आल्या. म्हणुन त्याच्यावर व भगवानदास माहौरवर स्फोटक पदार्थ कायदा कलम ६ अन्वये, आय.पी.सी.कलम ३०७ अन्वये व ऑर्म ॲक्ट कलम २० अन्वये खटला भरण्यात आला. " ।। ६ ।।

**जळगांवच्या न्यायालयात देशद्रोहींवर गोळीबार :-**

सदरचा खटला जळगांवच्या सत्र न्यायलयात चालला त्यावेळी हे न्यायालय आजच्या फुले मार्केटच्या समोर सिटी पोलीस स्टेशन आहे. तिथे हा खटला चलला त्या जागेचा पोलीसांनी कोर्टात सादर केलेला नकाशाही उपलब्ध आहे. तो अधिक माहीती साठी जोडला आहे. भगवानदास माहौर व सदाशिव मलकापूरकरांचे दोन साथीदार जयगोपाळ व फणिंद्र घोष माफीचे साक्षीदार म्हणुन कोर्टात हजर होणार आहे ही बातमी माहौर व मलकापूरकर यांना धुळयाच्या तुरंगामध्येच कळाली होती व त्यांनी या देशद्रोह्यांचा भर न्यायलयातच वध करण्याचा मनसुबा रचला होता. " प्रत्यक्ष खटल्यासाठी त्यांना जळगांव च्या लॉकअप मध्ये आणल्यावर बाहेरुन जेवणचा डबा मागविण्यासाठी त्यांनी कोर्टाची परवानगी मिळविली होती. या संधीचा फायदा घेऊन सदाशिवरावांचे वडील बंधु शंकरराव मलकापूरक यांनी जेवणाच्या डब्यातुन सदाशिवरांवांना भरलेले पिस्तुल पुरविले पिस्तुल मिळाल्यावर आनंदी झालेल्या भगवानदास माहौरांनी माफीचे साक्षीदार बनलेल्यांवर बेभान होऊन गोळीबार केला."।। ७ ।।

दिनांक २१/०२/१९३० रोजी जळगांव येथे सेशन कोर्टाच्या आवारात लाहोर कटाच्या व भुसावळ बॉम्बच्या खटल्यातील साक्षीदार व पंजाब पोलीसांवर झालेल्या हल्ल्याबाबत खान अब्दुल अजीज यांचा अहवाल प्रधान सचिव मुंबई सरकार यांना लाहोर येथुन पाठविलेल्या पत्रात पुढील प्रमाणे उल्लेख सापडतो " सदरचा खटला सेशन कोर्ट न्यायमुर्ती एस. जी. खारकर यांचे पुढे सुनावनी चालु होती कोर्टात प्रचंड गर्दी होती... दुपारी ०२.४५ च्या सुमारास ४ गोळया झाडल्याचा आवाज मला ऐकायला आला. मागच्या व्हरांडयात धावत गेल्यावर दिसले की, भगवानदासला पोलीसांनी पकडले आहे. व सदाशिवराव खुर्चीवर बसलेला आहे व हॉलंड साहेबही घटनास्थळी धाऊन आले होते... कोर्टाच्या बाहेर आल्यावर भगवानदास व सदाशिवराव यांना (आरोपीचा भाऊ शंकरराव मलकापूरकर) याने केळी व संत्री आरोपींना खायला दिले ते खाल्ल्यावर भगवानदास पळाला व तंबुत जाऊन पिस्तोलामधुन गोळया झाडु लागला

१ली गोळी त्याने फणिंद्रनाथवर झाडली परंतु ती त्याला लागली नाही २ री गोळी त्याने नानकचंदवर झाडली ती त्याच्या कमरेखाली लागली त्यानंतर त्याने पुन्हा फणिंद्रनाथ व जयगोपाळवर गोळया झाडल्या जयगोपळच्या डाव्या खांद्यावर गोळी लागली नंतर त्याचे पिस्तुल जाम झाल्याने तो तेथुन पळु लगला पोलीसांनी त्याला पकडले त्याला हे पिस्तुल कोणी दिले हे माहीत नाही... यावेळी कोर्टात व बाहेर मोठा जमाव जमला होता." ।।८ ।।

**क्रांतिकारकांना सक्त मजुरीची शिक्षा :-**

यानंतर टाईम्स ऑफ इंडीयाने २५ फेब्रु. १९३० ला बातमी प्रसिध्द केली की, " सदाशिव मलकापूरकर व भगवानदास माहौर यांना १५ वर्षाची सक्त मजुरीची व दंडाची शिक्षा ठोठावण्यात आली व त्यांची तुरंगात रवानगी करण्यात आली." ।। ९।। अभ्यासकांसाठी टाईम्स ऑफ इंडीयाची बातमी व या खटल्याचे जजमेंट शेवटी जोडले आहे. टाईम्स ऑफ इंडीया या इंग्रजी वृत्त पत्राने त्यावेळी भुसावळ बॉम्बे केसच्या एकुण १६ बातम्या प्रसिध्द केल्या त्यात हा उल्लेख सापडतो सदरचा खटला एस. जी. खारकर जिल्हा सत्र न्यायाधिश जळगांव यांच्या न्यायालयात चालविण्यात आला. सरकारतर्फे ॲड. आय. जी. इन्वेकर यांनी तर आरोपी तर्फे ॲड. पाटणकर ॲड. कानडे आणि ॲड देशपांडे यांनी काम पाहीले.

**क्रांतिकारकांना पिस्तोल कोणी पुरविले याचा गौप्यस्फोट :-**

सदाशिव मलाकपूरकर व भगवानदास माहौर यांना " प्रथम सक्कर व नंतर अहमदाबादच्या कारागृहात ठेवण्यात आले काँग्रेस मंत्रीमंडळ १९३७ मध्ये अधिकार रूढ झाल्यावर या प्रकरणी पुर्नविचार करण्यात आला आणि दोघा क्रांतिकारकांना मार्च १९३८ मध्ये मुक्त करण्यात आले. " ।। १० ।। भुसावळ बॉम्ब खटल्यातील आरोपींना पिस्तोल पुरविण्यावरुन जळगांवातील सदाशिव मलकापूरकरांच्या काही मित्रांवर खटला दाखल करण्यात आला. "ह्या क्रांतिकारकांना पिस्तुल पुरविण्याच्या आरोपावरुन १० खानदेशीय देशबांधवावर खटला भरण्यात आला... त्यात त्यांना शिक्षाही झाल्या पण पिस्तुल कोणी पुरविले हे अखेर पर्यंत समजु शकले नाही. त्याचा गौप्य स्फोट क्रांतीकारी सदाशिव मलकापूरकर यांनी स्वतःच त्यांचे सत्कार प्रसंगी जळगांव येथे केला... श्री सदाशिव मलकापूरकर व त्यांचे वडीलबंधु शंकररावजी मलकापूरकर कै. भगवानदासजीच्या पत्नी श्रीमती यमुनाबाई माहौर हे तिघे क्रांतीकारी... तारीख २३ मार्च १९८६ रोजी ५६ वर्षानंतर सरदार भगतसिंह यांच्या पवित्र स्मृतिदिनी भुसावळ व जळगांव येथे आले होते... या प्रसंगी बोलतांना शंकरराव मलकापूरकर यांनी आपण जळगांव येथील लॉकअप मध्ये डबा पोहचविण्यासाठी परवानगी मिळवुन डब्यामधुन पिस्तुल कसे पुरविले याची साद्यंत हकीगत सांगितली भोजनाच्यावेळी डब्यातुन मिळालेल्या पिस्तुलाने श्री भगवानदासजी यांनी कोर्टात गोळीबार करुन फितुरांना कसे जखमी केले ही चित्तथरारक हकीगत सांगितली क्रांतिकारक

श्री सदाशिव मलकापुरकर यांनी त्यांस दुजोरा दिला यामुळे पिस्तुल कोणी कसे पुरविले याचा गौप्य स्फोट केला.” ।।११।।

स्वातंत्र्य लढयाचे पुण्यस्मरण करुन देण्याची आज निकड यासाठी आहे. की, स्वातंत्र्यासाठी पडेल तो त्याग पडतील ते कष्ट व देशासाठी बलीदान देण्याची तयारी, देशावरील प्रमे व अपार निष्ठा व्यक्तविणाऱ्या या भुसावळ खटल्यातुन प्रेरणादायी संदेश आजच्या युवकांसाठी अत्यंत महत्वाचा व उपयुक्त आहे.

**निष्कर्ष :-**

निश्चितच भुसावळचा बॉम्ब खटला स्वातंत्र्य संग्रामातील क्रांतीकारकांच्या कार्याचा जळगांव जिल्ह्यास प्रेरणादायी व भुषणावह वाटणारा आहे. या खटल्यामुळे खानदेशातील लोकांच्या मनात स्वातंत्र्या बद्दल ओढ लागली होती. व ब्रिटीश सत्तेविरुध्द सामान्य लोकांच्या मनात तिव्र असंतोष निर्माण झाला होता. हीच या खटल्याची फलनिष्पत्ती मानावी लागेल. त्याच प्रमाणे ब्रिटीश पोलीस एखादया गुन्ह्याचा तपास किती जलद व बारकाईने करीत होते त्याच प्रमाणे त्यांची रिर्पोटींगची पध्दती आणि न्यायालयात कमी वेळात चललेला हा खटला. हे आजच्या शासनाला व पोलीस खात्याला मार्गदर्शक व उपयुक्त ठरु शकतो. त्याचप्रमाणे या खटल्यामुळे जळगांव जिल्ह्यातील स्वातंत्र्य चळवळ जोमाने कामाला लागली.

थोडक्यात भुसावळ बॉम्ब खटला हा जळगांव जिल्ह्याच्या स्वातंत्र्य आंदोलनातील रोमांचकारी अभूतपुर्व घटना आहे. झाशीला शिकणारे भगवानदास माहौर व सदाशिवराव मलकापूरकर हे चंद्रशेखर आझादांचे जवळचे स्नेही होते. हे त्यांना बॉम्ब बनविण्याचे कामी मदत करीत असत. चंद्रशेखर आझादांनी ग्वाल्हेर येथील बॉम्ब तयार करण्याच्या केंद्रातील बरेचसे साहित्य व २ पिस्तुले घेऊन अकाल्याला जाण्यास सांगितले हा अत्यंत गुप्त कट होता. माहौर व मलकापूरकर सायंकाळी भुसावळच्या रेल्वे स्टेशनवर उतरले. सिमाशुल्कच्या अधिकाऱ्यांना यांच्याजवळ असलेल्या लोखंडी पेटया पाहुन संशय आला. त्याने त्या तपासण्याचा आग्रह धरला. तपासणीसाठी पेटया उघडल्या मोठया कौशल्याने माहौरांनी कपडयात गंडाळलेले भरलेले पिस्तोल उचलुन लपविले. परंतु त्या गडबडीत काडतुसांचे एक पुडके खाली पडले व ते पाहिल्यावर त्याने रेल्वेच्या पोलिसांना शिटया मारुन बोलाविले याचवेळी माहौरांनी आपल्या जवळील पिस्तुलातुन गोळया झाडुन पळुन जाण्याचा प्रयत्न केला. मलकापूरकरांचा सिग्नलच्या तारेत पाय अडकला व ते पडले व ह्या दोघांना पकडण्यात पोलीसांना यश मिळाले. पूढे त्यांच्यावर खटला भरला गेला. व त्यांना धुळयाच्या तुरुंगात पाठविले. त्यांचे दोघे सहकारी जय-गोपाळ व फणींद्र घोष हे सरकारला माफीचे साक्षिदार म्हणुन फितुर झाले ही बातमी माहौर व मलकापूकरानां धुळयाच्या तुरुंगात कळाली होती, व त्यांनी या देशद्रोहयांचा वध करण्याचे ठरविले पुढे हा खटला जळगांवच्या सत्र न्यायालयात म्हणजे आजचे जळगांव सिटी पोलीस स्टेशन मध्ये सुरु झाला. या सर्वांना तिथे सुनावणीसाठी आणले. मलकापुरकरांनी आजारी आहे, जेवणाचा डबा घरून मिळावा अशी परवानगी कोर्टाकडुन

मिळविली होती. या संधीचा फायदा घेऊन सदाशिवरावांचे वडील बंधु शंकरराव मलकापूरकर यांना जेवणाच्या डब्यातुन सदाशिवरांवांना भरलेले पिस्तुल पुरविले. आणि त्यांनी जेवणाच्या सुटीत संधी साधुन जयगोपाळ व फणिंद्र घोषवर गोळीबार केला मात्र गोळया वर्मी न लागल्याने ते केवळ जखमी झाले. मलकापूरकर व माहौर यांना १५ वर्षाची सक्त मजूरीची शिक्षा झाली. पिस्तोल पुरविल्याच्या संशयावरुन खानदेशातील मलकापूरकरांच्या १० मित्रांना शिक्षाही झाल्या परंतु पिस्तोल कुणी पुरविले याचा उलगडा सरकारला शेवटपर्यंत झाला नाही. १९८६ मध्ये मात्र माहौरांच्या पत्नीचा व मलकापूरकर बंधुंचा सत्कार भुसावळ व जळगांवी करण्यात आला. त्यावेळी शंकरराव मलकापूरकरांनी मी पिस्तोल पुरविले हा गौप्य स्फोट जळगांवी केला सदरची घटना निश्चितच जळगांव जिल्ह्यासाठी स्वातंत्र्याबद्दलच्या लोकांच्या मनात ब्रिटीश सत्तेविरुध्द तिव्र असंतोष निर्माण करणारी होती. व त्यामुळे जिल्ह्यातील स्वातंत्र्य चळवळ पुन्हा जोराने फोफावली या लघु शोध निबंधासाठी मुंबईच्या होम डिपार्टमेंटल स्पेशल ब्रँचची संपुर्ण फाईलच संशोधनासाठी वापरण्यात आली.

**संदर्भग्रंथ सूची**

१) वैद्यराज रामभाऊ भोगे जळगांव जिल्ह्यातील स्वातंत्र्य लढयाच्या गत इतिहासाचे सिंहावलोकन प्रथमावृत्ती १९८८ पृष्ठ क्र. ९५,९६
२) रतनलाल जोशी संपादक क्रांतीकारी प्रेरणाके स्त्रोत प्रथमावृत्ती १९७२ पृष्ठ क्र. २३१
३) य. दि. फडके २० व्या शतकातील महाराष्ट्र खंड ३ रा प्रथमावृत्ती १९९१ पृष्ठ क्र. १४९
४) य. दि. फडके उपरोक्त पृष्ठ क्र. १५२
५) डॉ. कि. का. चौधरी संपादक महाराष्ट्र राज्य गॅझेटीअर जळगांव जिल्हा मराठी आवृत्ती सुधारीत १९९४ पृष्ठ क्र. १२३
६) होम डिपार्टमेंटल स्पेशल ब्रँच मुंबई फाईल क्र. ३२७/२७
७) डॉ. के. के. चौधरी जळगांव जिल्ह्यातील स्वातंत्र्य लढा प्रथमावृत्ती १९९७ पृष्ठ क्र. ४७
८) होम डिपार्टमेंटल स्पेशल ब्रँच मुंबई फाईल क्र. ३२७/१६७
९) टाईम्स ऑफ इंडीया वृत्तपत्रातील बातमी
१०) डॉ. कि. का. चौधरी उपरोक्त पृष्ठ क्र. १२३
११) वैद्यराज रामभाऊ भोगे उपरोक्त पृष्ठ क्र. ९७,९८

**परिशिष्ठे :-**

१. जळगांव न्यायालयाचा नकाशा (हल्ली त्या जागी असलेले शहर पोलीस स्टेशन)

ISSN : 2348-7143 (Online)
April-June-2014

२. रिपोर्टींग साठी केलेल्या तारा

३. खटल्याचे जजमेंट व टाईम्स ऑफ इंडीयाची बातमी

**परिशिष्ठे :**

**१. जळगांव न्यायालयाचा नकाशा (हल्ली त्या जागी असलेले शहर पोलीस स्टेशन)**




**२. रिर्पोटींग साठी केलेल्या तारा**



C. 3. POSTS TELEGRAPHS. 1674

Received here at 12 H. 55 M.

X 12/5 JALGAON PETH 22 STE 71

Bombay Home BOMBAY.

YESTERDAY DURING TRIAL OF BHUSAWAL BOMB CASE IN RECESS HOUR IN COURT COMPOUND ONE OF TWO ACCUSED FIRED PISTOL INJURING APPROVER WITNESS AND ANOTHER CROWDS COLLECTED OUTSIDE GATE DISTRICT MAGSTE AND SUPERINTENDENT OF POLICE ARRIVED AND RESTORED ORDER LATER AT NIGHT SOME TROUBLE OVER A STONE THROWER CAUGHT BY POLICE SOME PERSONS ENTERED COMPOUND BURNT SIGNBOARD BROKE GLASS PANES TOTAL DAMAGE SLIGHT.

DISTRICT JUDGE JALGAON.

R.J. No S.D. 857
22. 2. 30

H. S. R.

This form must accompany any inquiry respecting this Telegram.



BHUSAVAL BOMB CASE.

DETAILS OF JUDGMENT.

(FROM OUR OWN CORRESPONDENT.)

ATTEMPT TO MURDER.

३. खटल्याच्या टाईम्स ऑफ इंडीयातील बातमी



BHUSAWAL BOMB TRIAL.

JAIL FOR ACCUSED.

CONVICTION ON SEVERAL CHARGES.

(THROUGH ASSOCIATED PRESS.)

JALGAON, February 25.

Judgment was delivered to-day by Mr. Kharkar, District and Sessions Judge, Jalgaon, in the Bhusawal Bomb Case. Sadhashiv Raghunath Malkapurkar was convicted under Section 4 (b) of the Explosive Substances Act and sentenced to transportation for 15 years. He was also convicted under the Arms Act and sentenced to two years' rigorous imprisonment, both sentences to run concurrently. He was also convicted under the Railways Act and sentenced to pay a fine of Rs. 500 or in default to two months' rigorous imprisonment.

The Judge convicted Bhagwandas for attempt to murder Bendiferi, police constable, and sentenced him to seven years' rigorous imprisonment. Bhagwandas was also convicted under the Arms Act and sentenced to two years' rigorous imprisonment, both sentences to run consecutively.

The Judge acquitted Bhagwandas under the Explosive Substances Act for want of evidence. He was also convicted under the Railways Act and sentenced to pay a fine of Rs. 100 or in default to one month's rigorous imprisonment. Both the accused received the sentences silently. Bhagwandas was immediately sent to Dhulia while Sadhashiv continues to be here.